# दिनांक 19/04/2025

**1.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 16:00 वा ते दि. 18/04/2025 रोजी 16:00 वा च्या दरम्यान मौजे मानी फाटा येथे अलिबाग मांडवा रस्त्यावर, ता.अलिबाग येथे मोटार सायकल क्रं एम एच 06/बी.एस 5241 व इनोव्हा कार क्रं एम एच 02 डीजे 8121 यामध्ये अपघात होवुन सदर अपघातामध्ये मोटार सायकल वरिल एक महिला व एक पुरुष हे मयत झाल्याने तेथे आरोपी क्रं 1 ते 14 यांनी 100 ते 150 असे अनोळखी इसमांची गैरकायदयाची मंडळी जमवुन तेथे इनोव्हा कार मधील चालक यांस आमच्या ताब्यात दया असे बोलुन इनोव्हा कार चालक यास ताब्यात दिले नाही म्हणुन इनोव्हा कार वर दगड फेक करुन इनोव्हा कारच्या काचा फोडल्या तसेच सदरचे दगड हजर असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना लागुन त्याना दुखापती केल्या व शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला व मा.जिल्हाधिकारी सो रायगड अलिबाग यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.68/2025 BNS 2023 चे कलम 189(2), 189(3), 191(2),190,121(1),223 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/ मुंजाबा गायकवाड हे करीत आहेत.

**2.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 19:45 वा ते दि. 18/04/2025 रोजी 19:45 वा च्या दरम्यान मौजे चेंढरे येथील के टी एम शोरुमचे बाजुला, ता.अलिबाग येथे फिर्यादी रा.पाटीलवाडी चेंढरे, ता.अलिबाग हे चेंढरे येथील चहा व स्नॅक्सचे दुकानात काम करित असताना आरोपी रा.संभाजीवाडा,राजमळा ता.अलिबाग हा फिर्यादी यांचे दुकानामध्ये फिर्यादी यांचे पाठिमागुन अचानकपणे त्याच्या हातामध्ये कोणतेतरी टणक वस्तु घेवुन त्या टणक वस्तुने फिर्यादी यांचे डोक्यामध्ये पाठीमागुन मारुन फिर्यादी यास दूखापत केली तसेच आरोपी याने पुन्हा फिर्यादी यास तुला मारुन टाकीन अशी धमकी देवुन तेथुन निघुन गेला.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.69/2025 BNS 118(1), 351(2)(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पो.हवा/सागर राउत हे करीत आहेत.

**3.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/04/2025 रोजी 01:30 वा च्या सुमारास मौजे. मालवाडी येथे फिर्यादी रा. मालवाडी, कर्जत, यांचे राहते घरी, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी रा. मालवाडी, कर्जत यांचे राहत्या घराच्या किचनमधील खिडकीची झडप उघडुन त्यावाटे आत प्रवेश करुन घरातील बेडरुम मधील लोखंडी कपाटातील तिजोरी उघडुन फिर्यादी

यांचे संमतीशिवाय, लबाडीच्या उददेशाने, स्वत:च्या फायदया करीता एकूण 7,18,000/- रुपये व किंमतीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेले.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.106/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 305(a),331(3),331(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री. जयवंत वारा हे करीत आहेत.

**4.** मांडवा (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/04/2025 रोजी 10:00 वा च्या दरम्यान मौजे किहीम येथे गट क्र 429 या मिळकतीमध्ये, अलिबाग येथे फिर्यादी यांचे बहीणीचे पतीचे नावे असलेले किहीम येथील गट क्र.429 या मिळकतीचे गेटचे कुलुप तोडुन आरोपीत क्र 01 व 02 रा. किहीम, ता.अलिबाग याने आत प्रवेश करुन मिळकतीमध्ये असलेल्या घराचे दरवाजाचे कुलुप तोडुन घरात प्रवेश करुन राहण्यास गेले त्या घरात राहणारा माळी यांस शिविगाळी केली फिर्यादी व साक्षीदार यांनी आरोपीत यांना तुम्ही आमच्या घरातुन निघुन जा तुमचा इथे काहीही संबंध नाही असे सांगितले तरीही ते तेथुन निघुन न जाता फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी व दमदाटी केली.

याबाबत मांडवा (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.47/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम, 331(3),329(3) (4),351(2)(3),352, 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोहवा/मनीषा पाटील ह्या करीत आहेत.

**5.** पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/04/2025 रोजी 01:00 वा च्या सुमारास मौजे जलपाडा येथे एम.आय.डि .सी जलकुंभ जवळ, अलिबाग येथे आरोपीत क्र 01 यांने फिर्यादी यांचा मुलगा याला त्याचा मोबाईल क्रमांक वर फोन करुन त्याचे कडे तीन लाख रुपये खंडणीची मागणी करुन फिर्यादी यांनी आरोपीत नं 01 याला खंडणी रक्कम दिली नाही म्हणुन फिर्यादी यांचे नुकसान करण्याचे उददेशाने आरोपीत क्र 01 व त्याचे साथिदार आरोपीत यांने आपसात संगणमत करुन फिर्यादी यांचे मालकिची एस.एल.एम.मशिन तीचा आर.टी.ओ.क्रमांक एम.एच.46 सी.एच 9072 हीला आग लावुन जाळुन नुकसान केले.

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे गुरनं. 36/2025, भा न्या संहिता कलम 308(4),326(f), 324(5),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री अंकुश सांगळे हे करीत आहेत.

**6.** पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/04/2025 रोजी 01:30 वा च्या सुमारास मौजे पाली खोपोली रोडवरील महानगर गॅस पंपाजवळ चिवे गावचे हददीत ता.सुधागड येथे फीर्यादी याने आपल्या ताब्यातील अशोक लॅलन्ट टोम्पो नंबर एम.एच 43 बी.एक्स.8886 रोडच्या कडेला घेउन पार्कीग लाईट लावून उभा केलेला असतांना त्यास रस्त्याच्या पाठीमागुन आलेला टॅकर एम.एच46 सी.यु 8699 वरील आरोपी चालक रा देवरीहन गाव रीवा मध्यप्रदेश याने पाठीमागुन धडक देउन अपघात केलेला आहे सदर अपघातामंध्ये टेम्पो मधील बसलेला साक्षीदार हेल्पर यास कीरकोळ जखमी केलेले आहे तसेच दोन्ही वाहनाचे नुकसान झाले आहे.

याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं.35/2025, भारतीय न्याय संहिता कलम 281,125(a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई जिवडे हे करीत आहेत.

**7.** वडखळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/04/2025 रोजी 18:30 वा च्या सुमारास मौजे जे.एस.डब्ल्यु. स्टील कंपनी डोलवी येथील लोडींग पाॅईट, ता.पेण येथे आरोपीत चालक रा. देशमुख वस्ती, जावळा, ता.सांगोळा जि.सोलापुर, याने त्याच्या ताब्यातील ट्रेलर नंबर एम एच 46 बी.एम. 9843 मध्ये जे.एस.डब्ल्यु. कंपनीतील टीटीपीएस कॉन्ट्रॅकमधील सुपरवायझर आरोपीत यांच्याशी संगणमत करून जे.एस.डब्ल्यु. कंपनीतील लोखंडी सळईचा एकूण 2,72,000/- रुपये व किंमतीचा बंडल स्वतःचे फायदयाकरिता लबाडीचे ईरादयाने चोरून नेला.

याबाबत वडखळ पोलीस ठाणे गुरनं. 37/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/ मंगेश धुपकर हे करीत आहेत.

**8.** दादर (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/04/2025 रोजी 09:30 वा च्या सुमारास मौजे फिर्यादीचे घराजवळ मौजे हापशीर आळी, दादर येथे फिर्यादी रा. हापशीर आळी, दादर, पेण हे घराचे अंगणात उभे असताना फिर्यादी यांचा मुलगा त्याची गाडी घेवून जात असताना त्यास फिर्यादी यांचे शेजारी राहणारे साक्षीदार यांची आई हिने फिर्यादी यांचे मुलास तू आज इथून गाडी घेवून चाल्लास परत इथून आमचे दारासमोरून गाडी नेवू नकोस असे बोलल्याने त्या गोष्टीची विचारणा करण्यास फिर्यादी हे गेले असता फिर्यादी यांना आरोपीत नं.1 ते 5 हे सर्वजण एकत्रित जमून त्यांनी शिवीगाळी करून तसेच आरोपीत नं.5 रा. हापशीर आळी, दादर, ता.पेण याने फिर्यादी यांचे जवळ येवून त्यांनी फिर्यादी यांना शिवीगाळी करित हाताबुक्क्याने मारहाण केली.

याबाबत दादर (सागरी) पोलीस ठाणे गुरनं. 18/2025, भारतीय न्याय संहिता 190, 189(1) 189(2), 115(2), 352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोहवा/सुचित्रा म्हात्रे ह्या करीत आहेत.

**9.** रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 21:30 वा च्या सुमारास मौजे सावळे गावातील स्मशानाभुमीजवळील पाण्याच्या ओढयाजवळ, पनवेल येथे फिर्यादी व साक्षीदार हे मासेमारी करीता गेले असता त्या गोष्टीचा मनात राग धरुन आरोपीत क्र 1 ते4 , रा. सावळे ता.पनवेल यांनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना शिविगाळी दमदाटी करुन फिर्यादी यास आरोपीत क्र 2 व 3 यांनी हाताबुक्क्यांनी मारहान केली तसेच आरोपीत क्र.2 याने जखमी क्र 2 यांचे दोन्ही पायावर लोखंड रॉडची उपट टाकुन दुखापत केली तसेच आरोपीत क्र 4 याने जखमी क्र 3 व 4 यांचे हातावर व मानेवर लाकडी काठीने उपट टाकुन मारहान केली.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं. 84/2025, बी.एन. एस. कलम 118(1), 115(2),352, 351(2) ,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोना/शेळके हे करीत आहेत.

**10.** दादर (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/04/2025 रोजी 09:30 वा च्या सुमारास मौजे हापशीर आळी, दादर, ता.पेण येथे फिर्यादी हे यांचे घरामध्ये असताना फिर्यादी यांची सासु हया घराचे बाहेर बसलेल्या असताना फिर्यादी यांचे शेजारी राहणारा यांनी त्यांची गाडी घराचे समोरील रोडवरुन नेली असता फिर्यादी यांची सासु हया म्हणाल्या काल या गोष्टीवरुन शिवीगाळ झाली होती तरी पण आज येथुनच गाडी घेवुन गेलास असे बोलल्या असता आरोपी क्र 01 रा. हापशीर आळी, दादर, ता.पेण हि फिर्यादी यांची सासु हिस शिवीगाळ करत असल्याने फिर्यादी या बाहेर आल्या असता आरोपित क्र 02 व 03 रा. हापशीर आळी, दादर, ता.पेण हया देखील येथे येवुन त्यांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करत आरोपी क्र 02 यांनी फिर्यादी यांचे दिर यांचे पाठीत काठीची उपट मारुन त्यांचे हातावर चावा घेतला.

याबाबत दादर (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.19/2025, भारतीय न्याय संहिता कलम 118(1),352 3(5) 118(1),352 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोहवा/सुचित्रा म्हात्रे ह्या करीत आहेत.

**11.** पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे कामार्ली नर्सरीवाडी पो. कामार्ली फिर्यादी यांचे घरातुन, ता पेण येथे फिर्यादी यांची पत्नी व मुलगी वय- 01 वर्षे, रा.कामार्ली नर्सरीवाडी पो. कामार्ली ता. पेण यांना फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन कोणीतरी अज्ञात कारणसाठी फुस लावुन पळवुन नेले.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.71/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 137 (2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई पोकळे हे करीत आहेत.

**12.** महाड (शहर) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/04/2025 रोजी 12:00 वा च्या सुमारास मौजे नवेनगर येथील फिर्यादी यांचे राहते घरी ता. महाड येथे फिर्यादी यांचे एकूण 2,46,000 /- रुपये व किंमतीचे सोन्याचे दागिने हे दि 18/04/2025 रोजी सकाळी 12.00 ते दुपारी 13.50 वाचे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे घराचे लोखंडी दरवाजाचे लॉक तोडुन घरामध्ये प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटाचे ड्रॉव्हर कशाचे तरी सहाय्याने उचकटुन त्यात ठेवलेले सोन्याचे दागिने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने स्वत:चे फायदयाकरीता चोरी करुन घेवुन गेला.

याबाबत महाड (शहर) पोलीस ठाणे गुरनं.37/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 305,331(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि श्री शिवराम खाडे हे करीत आहेत.

**13.** पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 22:15 वा च्या सुमारास मौजे खिडकी गावचे हददीतील आरोपीत रा.खिडकी ता.अलिबाग याचे राहते घरासमोर रस्त्यावर, अलिबाग येथे फिर्यादी हे त्याचे खिडकी येथिल घरुन गावातील मित्रमंडळीची 11 मारुती येथे ट्रिप जात असलेल्या बसच्या ठिकाणी एमआयडीसी रोडने पायी चालत जात असतांना आरोपीत

याचे घरासमोर रस्त्यावर आलेवेळी आरोपीत यांने मागील गोष्टीचा राग मनात धरुन फिर्यादी यांना बघुन थुंकु लागला व त्याने फिर्यादी यांना शिवीगाळी केली म्हणुन त्याबाबत फिर्यादी यांनी त्यास विचारले असता मी तुलाच शिवी देतो असे बोलला त्यावेळेस फिर्यादी हे वाद नको म्हणुन पुन्हा बसकडे चालत जात असतांना आरोपीत याने त्याचे घरातुन लोखंडी रॉड घेवुन फिर्यादी याचे पाठीमागुन येवुन आरोपीत याने लोंखडी रॉडने फिर्यादी यांचे डोक्यात, डावे कानावर व पाठीवर उपटी मारुन दुखापत केली.

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे गुरनं.37/2025, भा न्या संहिता कलम 118(1),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/वाघमारे हे करीत आहेत.

**14.** मांडवा (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/04/2025 रोजी 16:15 वा च्या सुमारास मौजे बामणसुरे समेळवाडी येथे राहणारे नवनीत करमेळे यांचे घरासमोर, अलिबाग येथे महिला फिर्यादी यांचे पती हे किहीम ग्रामपंचायतचे सरपंच असुन ग्रामपंचायत हद्दीतील शासनाकडुन मंजुर झालेल्या रस्त्याच्या कामाची सुरवात करण्याकरीता रस्त्याचे काम मिळालेल्या कंस्ट्रक्शनचे मालक यांचे सुपरवायझर केतन यांनी फिर्यादी यांचे पती यांना नारळ फोडण्यासाठी बोलविले होते. फिर्यादी व त्यांचे पती तसेच इतर लोक व ग्रामस्थ असे सदर ठिकाणी नारळ फोडण्याच्या कार्यक्रमाकरीता गेले असता नारळ फोडण्याकरीता नारळ हातात घेतला असता रस्त्याच्या डांबरी कारणाच्या श्रेयवादावरून त्यावेळी तेथे अगोदरच हजर असलेले आरोपी क्रमांक 1 व 2 तेथे आले व फिर्यादी व त्यांचे पती यांना तुमचा नारळ फोडण्याचा संबध काय तु इथे का आलास? असे बोलुन आरोपी क्रमांक 2 यांने भेंच्योत अशी शिवीगाळी करून आरोपीत क्रंमांक 01 यांने फिर्यादी यांना तु काय माझी झाटा उपटणार आहेस का? अशी अर्वाच्च भाषेत शिवीगाळी करून त्यांचे कंबरेला लावलेल्या पिस्टलकडे इशारा दाखवुन फिर्यादी यांचे पती यांना जिवेठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत मांडवा (सागरी) पोलीस ठाणे गुरनं. 46/2025शस्त्र अधिनियम, 1959, विनापरवाना अग्नीशस्त्र (कलम 3/25 प्रमाणे), भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 79, 351 (2)(3), 352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि दिपक भोई हे करीत आहेत.

**15.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 19:50 वा च्या सुमारास मौजे माणगाव एस टी स्टॅण्ड ता. माणगांव येथे आरोपी लोकसेवक प्रतिलिपी लिपीक तथा भुकरमापक भुमिअभिलेख कार्यालय म्हसळा ता. म्हसळा, यांनी साक्षीदार यांचे मौजे वरवटणे ता म्हसळा येथील सर्वे नं 52/1(ब) सर्वे नं 52 या जमीनीची मोजणी व आकार फोड करुन चर्तुसिमा निश्चीत करुन क पत्रक देण्याकरीता फिर्यादी रा.साने आळी म्हसळा ता.म्हसळा यांचेकडे पंचासमक्ष 50,000/- रुपये रक्कमेची लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले तसेच फिर्यादी यांचेकडुन पंचसाक्षीदार यांचेसमक्ष माणगाव एस टी स्टॅण्ड आवारामध्ये 50,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारले. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 18/04/2025 रोजी 10:48 वा अटक करण्यात आली आहे.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं.82/2025लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, 1988, पोलीस विभाग प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो रायगड/ श्री शशिकांत पाडावे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 18.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 273 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,28,750/-रुपये इतका दंड आकारला आहे.